जिल्हा परिषदेकडून मोठ्या रकमेची कामे ग्राम पंचायतीस देण्यापूर्वी ग्राम पंचायतीच्या आर्थिक स्थितीची तपासणी करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग,
परिपत्रक क्रमांक-पंरास/झेडपीए-१०९०/प्र.क्र. १११३/३३,
मंत्रालय, मुंबई:४०० ०३२, दिनांक:-२५ ऑक्टोबर, १९९०.

परिपत्रक:- पंचायत समिती स्तरावर शासनाच्या किंवा जिल्हा परिषदांच्या निरनिराळ्या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा परिषदांना ग्राम पंचायतीकडून अनुदान देण्यात येते. तथापि, पंचायत राज समितीने शासनाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, ग्राम पंचायती ठराव करून आपल्या हिश्याची रक्कम खर्च करू शकत नाहीत व जिल्हा परिषदा निव्वळ ग्राम पंचायतीच्या ठरावावर अवलंबून राहून कामास सुरुवात करण्यास परवानगी देतात. नंतर सदरहू काम अपु-या निधीपाई वर्षानुवर्षे पडून रहाते व त्यामुळे अंदाजपत्रकापेक्षा खर्चाची रक्कम वाढून काम वर्षानुवर्षे पडून रहाते व त्यावर खर्च केलेला जिल्हा परिषदेचा पैसा फुकट जातो.

सबब, शासन आता अशा सूचना देत आहे की, जिल्हा परिषदांनी मोठ्या रकमेची कामे ग्राम पंचायतीस देण्यापूर्वी ग्राम पंचायतीच्या आर्थिक क्षमतेची तपासणी करण्यात यावी. जेणेकरून ग्राम पंचायतीच्या हिश्या अभावी कामे अपूर्ण राहणार नाहीत व कामावरील केलेला खर्च निष्फळ ठरण्याचीही भिती राहणार नाही. याबाबत सर्व जिल्हा परिषदांनी खबरदारी घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ वि. शं. धाकुस ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
मुख्य लेखा निधी निरीक्षण स्थानिक लेखा परीक्षण, नवी मुंबई,
कार्यासन क्र. २३, २८, ३० व ५७ ग्राम विकास विभाग,
निवड नस्ती, कार्यासन क्रमांक-३३, ग्राम विकास विभाग.